


दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २१५ ●मंगळवार,दि.०४ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# तुकाराम मुंढेंचा आयुक्तांच्या अधिकारांबाबत धडाकेबाज निर्णय; 'हे' पाऊल मोठा बदल घडविणार...

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव तुकाराम मुंढे हे या पदावर रुजू झाल्यापासून सातत्याने धडाकेबाज निर्णय घेत आहेत. त्यात आता आणखी एका निर्णयाची भर पडली आहे. यावेळी त्यांनी विभागाच्या आयुक्तांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. दिव्यांग कल्याण आयुक्तांना आता 'राज्य आयुक्त' न्यायालयीन अधिकार बहाल करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, हक्क, सुरक्षा आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाकडून विविध प्रकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.




याच पार्श्वभूमीवर आता सरकारने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ७९ ते ८३ नुसार आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना 'राज्य आयुक्त' म्हणून अधिसूचित करण्यात आले असून, त्यांना न्यायालयीन अधिकार बहाल करण्यात आले आहेत. दिव्यांग कल्याण आयुक्तांना आता न्यायालयीन अधिकार बहाल झाल्याने राज्य आयुक्तांच्या चौकशी, तपासणी आणि कार्यवाही प्रक्रियेला अधिक सुसूत्र आणि परिणाम कारक करण्यासाठी मानक कार्यपद्धती तयार करण्यात आली असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

राज्य आयुक्तांकडे दिव्यांग व्यक्ती, त्यांचे पालक किंवा कायदेशीर प्रतिनिधी तक्रार दाखल करू शकतात. तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादीस नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मागवले जाईल. प्रतिवादीने १५ दिवसांत उत्तर सादर करावे लागेल, त्यानंतर ३० दिवसांत सुनावणी पूर्ण केली जाईल. सुनावणीसाठी दोन्ही पक्ष उपस्थित राहतील. सुनावणीसाठी प्रतिवादी उपस्थित राहिला नाही तर आयुक्तांना एकतर्फी निर्णय घेण्याचा अधिकार असेल. राज्य आयुक्तांच्या शिफारशींवर संबंधित प्राधिकरणाने कार्यवाही करणे बंधनकारक आहे. शिफारशीवर केलेली कार्यवाही किंवा कारणासहित नकार अहवाल ९० दिवसांत राज्य आयुक्तांकडे सादर करावा लागेल.

## लाचखोर पीएसआयच्या घरी सापडले 'घबाड' !
## ५१ लाखांची रोकड, दागदागिने, मालमत्तेची कागदपत्रे जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

४ कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात २ कोटी रुपयांची लाच मागून त्याचा पहिला हप्ता स्वीकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पिंपरी चिंचवड आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस उपनिरीक्षक प्रमोद रवींद्र चिंतामणी याला रविवारी सापळा रचून पकडले. त्यानंतर



पोलिसांनी तातडीने चिंतामणी याचा भोसरीतील दिघी रोड येथील गंगोत्री पार्कमधील सोपान रेसिडेन्सी येथील घरावर दुसऱ्या पथकाने छापा घातला. या घर झडतीत पोलिसांना मोठे घबाड आढळून आले आहे. पोलिसांनी या घरझडतीत तब्बल ५१ लाख रुपयांची रोकड आढळून आली. याशिवाय ▶▶ उर्वरित पान २

## लाडक्या बहिणींसाठी गुड न्यूज, ऑक्टोबरचे 1500 रुपये उद्यापासून बँक खात्यात येणार, आदिती तटकरेंची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या महिला व बाल विकास विभागाकडून राबवल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑक्टोबर महिन्याचा हप्ता उद्यापासून मिळणार आहे. ऑक्टोबर महिन्याचे १५०० रुपये कधी मिळणार याकडे सर्व पात्र महिलांचं लागलं होतं, त्यांना या निमित्तानं दिलासा मिळाला



आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ऑक्टोबर महिन्याचा हप्ता जारी करण्यासंदर्भात माहिती दिली आहे. याचवेळी पात्र महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची केवायसी पूर्ण करुन घेण्याचं आवाहन आदिती तटकरे यांनी केलं आहे. आदिती तटकरे यांनी एक्स या प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महिला सक्षमीकरणाची अखंड क्रांती असल्याचं म्हटलंय. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑक्टोबर महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस उद्या पासून सुरुवात होत आहे. लवकरच योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होणार आहे, अशी ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार रोजी दयानंद म. कोरेगावकर यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील तिसऱ्या पुण्यतिथी कार्तिक शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.दयानंद महाराज कारेगांवकर यांचे बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मौज यांच्याकडून म हाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## स्व.संपदा मुंडे महाराष्ट्राची लेक, तीला न्याय मिळेपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही- खा.सुप्रिया सुळे

**खा.सुप्रिया सुळे, खा.बजरंग सोनवणे, आ. संदीप क्षीरसागर यांनी घेतली डॉ. मुंडे कुटुंबीयांची भेट**

**बीड । प्रतिनिधी**

स्व.डॉ.संपदाताई मुंडे प्रकरणात सत्ताधारी मंडळींकडून अतिशय गलिच्छ स्टेटमेंट येत आहेत, हे चुकीचे आहे ती कोणाचीतरी लेक आहे. याचे भान तरी किमान ठेवले पाहिजे. राजकीय मतभेद माणुसकीच्या नात्याने बाजूला ठेवले पाहिजे. आम्ही पीडीतांना न्याय देण्यासाठी राजकारण विसरून सरकारसोबत



उभे रहायला तयार आहोत. परंतु या सरकारनेही आरोपींची पाठराखण न करता न्याय्य भूमिका घेतली पाहिजे.कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही असा विश्वास खा.सुप्रियाताई सुळे यांनी मुंडे कुटुंबियांना दिला.

केंद्रीय गृहमंत्री अमित भाई शाह यांना देखील या प्रकरणाची माहिती देणार आहोत. आ.संदीपभैय्या यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा ▶▶ उर्वरित पान २ वर

## भरधाव ट्रकने १७ वाहने चिरडली, १९ जणांच्या चिंधड्या; ट्रक डायव्हरचा रस्त्यावर रक्ताचा पाट, ३०० मीटरपर्यंत वाहने ठोकली




**वृत्तसंस्था**

जयपूरमध्ये एका भरधाव वेगाने येणाऱ्या डंपर ट्रकने एकामागून एक १७ वाहनांना दिलेल्या भीषण धडकेत १९ जणांचा चिंधड्या झाल्या. मृत्यू झालेल्यांपैकी अनेकांचे मृतदेह छिन्नविच्छिन्न झाले आहेत. सहा गंभीर जखमींना एसएमएस हॉस्पिटल ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी सांगितले की, हा अपघात (३ नोव्हेंबर) दुपारी हरमडा येथील लोहा मंडी येथे घडला. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास, डंपर महामार्गावर जाण्यासाठी रोड क्रमांक १४ वरून लोहा मंडी पेट्रोल पंपाकडे जात होता. यादरम्यान, तो वाहनांना धडक देत सुटला. घटनास्थळी लोकांनी डंपर चालकाला पकडले. तो मद्यधुंद होता. ▶▶ उर्वरित पान २ वर

## महिला डॉक्टरचे चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजून पदावर कशा? अजित पवार अशा कोणत्या 'रुपात' अडकलेत? प्रकाश महाजनांचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर: फलटण डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरून मनसेचे माजी प्रवक्ते प्रकाश महाजन यांची रुपाली चाकणकर आणि जयकुमार गोरे यांच्यावर जोरदार टीका केली. मृत डॉक्टर महिलेचे चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजून ही पदावर कशा? अजित पवार अशा कोणत्या रुपात अडकलेत? असा प्रश्न त्यांनी विचारला. जयकुमार गोरे सारखे लोक हे मूळचे बाहेरचे आहेत, बाहेरून येताना त्यांनी सोबत रोग आणल्याची




टीकाही महाजन यांनी केली.

फलटण महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणावरुन प्रकाश महाजन यांनी राज्य सरकारवर ताशेरे ओढले. तसेच गोपीनाथ मुंडे यांच्या वारस कोण यावर बोलणाऱ्या पाशा पटेल यांच्यावरही त्यांनी उपटसुंभ म्हणत टीका केली. फलटण प्रकरणात म हिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांनी पत्रकार परिषद घेऊन मृत महिलेचे चॅट समोर आणले. त्यावरून प्रकाश महाजन यांनी त्यांच्यावर टीका केली. रुपाली चाकणकरांनी त्या मृत महिलेचे चारित्र्यहनन केल्याचं प्रकाश महाजन यांनी म्हटलं. ती डॉक्टर बीड जिल्ह्यातील असल्याने आम चे भावनात्मक नाते आहे. एवढं होऊनही रुपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कशा? ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: डॉ .ज्योतीताई विनायकराव मेटे, अध्यक्ष ,शिवसंग्राम यांची डॉ.प्रमोद शिंदे आणि डॉ.सौ.सुषमा प्रमोद शिंदे यांच्या सह्याद्री ऑर्थोकेअर हॉस्पिटल व निरामय आयुर्वेद चिकित्सालय येथे भेट दिली असता त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.*




# यश ढाका हत्या प्रकरण: पोलिसांच्या भूमिकेवर शंका

**आक्रोश मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकला**





**बीड । प्रतिनिधी**

यश ढाका या युवकाचे धारदार शास्त्राचे वार करून हत्या करणाऱ्या आरोपींना आणि मुख्य सूत्रधाराला पोलीस पाठीशी घालत आहेत असा आरोप करतानाच न्याय मागण्यासाठी सोमवारी आक्रोश मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकला यावेळी मोर्चा कऱ्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर शंका उपस्थित करत आपल्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाला दिले. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरामध्ये यश ढाका या युवकावर धारदार शास्त्राचे वार करून त्याची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, परंतु या प्रकरणाचा तपास योग्य पद्धतीने होत नसल्याचे वारंवार ढाका कुटुंबीयांच्या वतीने निवेदने देऊन पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्याचे प्रयत्न झाले. असे असताना आजही ढाका यांच्या अपेक्षेप्रमाणे पोलिसांचा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सोमवारी जिल्हा कचेरीवर आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाच्या माध्यमातून पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्याबरोबरच पोलीस अधीक्षक नव्हे तर पोलीस प्रशासनातील काही अधिकारी आणि कर्मचारी यांची तपास कामी होत असलेली लुडबुड व सूत्रधार असलेल्या व्यक्तीला मिळणारे अभय याप्रकरणी रोष व्ये करण्यात आला.

मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकल्यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले यावेळी अनेकांनी पोलिसांच्या भूमिकेवर शंका व्ये केली दलित समाजातील व्यक्तीवर अन्याय होत असताना पोलीस आरोपींना मदत करत असल्यामुळे त्या गुन्हेगारांबरोबरच मदत करणाऱ्यांना देखील गुन्हेगार संबोधले पाहिजे अशा भावना व्ये करण्यात आल्या या मोर्चामध्ये वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकत्यारसह महिला, नागरिक आणि तरुणांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# विवाह सोहळ्यांचे बदलते स्वरूप - योग्य की अयोग्य ?

तुळशी विवाह लागले की लगीनसराई सुरु होते. काही दिवसांतच आजूबाजूला सनई चौघड्यांचे सूर कानी पडू लागतील. हिंदू धर्मात १६ संस्कारांपैकी पाणिग्रहण म्हणजेच विवाह संस्काराला अनन्यसाधारण महत्व आहे. ब्रह्मचर्याश्रमांतून गृहस्थाश्रमाला सुरुवात करण्यापूर्वी जो संस्कार केला जात असे त्यालाच पूर्वी विवाह संस्कार म्हटले जात असे. आजही गृहस्थाश्रमाला म्हणजेच संसाराला सुरुवात करण्यातील आरंभीचा टप्पा म्हणून विवाह संस्काराचे महत्व अबाधित आहे. देव, अग्नी आणि ब्राह्मण यांच्या साक्षीने हा विवाह संस्कार पार पडतो. विवाह संस्कारामध्ये श्री गणेश पूजन, सीमांतपूजन, मधुपर्कपूजन, गौरीहरपूजन, कन्यादान, मंगळसूत्र बंधन, अक्षतारोपण, मंगलाष्टके, विवाह होम, पाणिग्रहण, लाजाहोम, सप्तपदी, गर्भाधान असे अनेक विधी असतात. या प्रत्येक विधीच्या वेळी म्हटले जाणारे मंत्र, केलया जाणाऱ्या कृती यामागे ऋषीमुनींचा संकल्प कार्यरत असतो, त्यामुळे या विधी भावपूर्ण होणे अत्यंत महत्वाचे असते.



विवाह संस्कार म्हणजे उभयतांना केवळ सहचर्य करण्याची अनुमती देणारा संस्कार नसून भावी जीवनात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची सांगड घालण्याची शिकवण देणारा संस्कार आहे. विवाहसंस्कारात नियोजित विधींना अधिक महत्व देण्यात आले आहे. सध्याच्या घडीला विवाहातील धार्मिक विधींपेक्षा अन्य गोष्टींना आणि कृत्रिम अवडंबराला अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. विवाह संस्कारात अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव झाला आहे, ज्यामुळे विवाहातील मुख्य विधींनाच बगल दिली जात आहे. विवाहासारख्या धार्मिक कार्यक्रमाचाही इव्हेन्ट होऊ लागला आहे, ज्यामुळे त्यातील सात्विकताच लोप पावू लागली आहे. विवाह जुळवण्यासाठी हुंडा देणे आणि घेणे दोन्हीही भारतीय दंडविधानानुसार गंभीर गुन्हे आहेत. तरीही देशातील अनेक भागांत आजही हुंडा दिला आणि घेतला जात आहे. या हुंड्याच्या लोभामुळे दरवर्षी कितीतरी नववधूंचा छळ केला जातो. त्यापैकी कितीतरी जणी या छळाला कंटाळून आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग स्वीकारतात. व्हाट्स अप आणि टेलिग्राम च्या दुनियेतेतही आज महागड्या लग्नपत्रिका छापल्या जातात. लग्न पार पडल्यानंतर खरेतर पत्रिकेला काहीच महत्व उरत नाही, तरीही केवळ आपली पत दाखवण्यासाठी काही ठिकाणी महागड्या पत्रिका छापल्या जातात. विवाहाचे बॅनर्स आणि होर्डिंग्स लावण्याची पद्धत गेल्या काही वर्षांपासून रूढ होत चालली असून यावरही अवास्तव खर्च केला जात आहे. विवाहासाठी निश्चित केलेल्या मुहूर्तावर विवाह लागणे, अत्यंत महत्वाचे आहे, पुरोहितांकडून मुहूर्ताच्या वेळी वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी देवतांना उपस्थित राहण्यास आवाहन केले जात असल्याने मुहूर्ताला देवता सूक्ष्मरूपाने येतात, असा लोकांचा समज आहे. त्यामुळे पूर्वी मुहूर्तावर विवाह लागण्यासाठी आधीपासूनच सर्व सिद्धता केली जात असे. आजमितीला विवाहाच्या मुहूर्तापेक्षा जवळच्या नातेवाईकांची उपस्थिती आणि वधू-वरांचा मेक अप यांना अधिक महत्व दिले जाते. त्यासाठी विवाह रोखून धरला जातो. अनेक जण लग्न लागल्यानंतर स्वागत समारंभाची आणि भोजनाची वेळ पाळून विवाहाला उपस्थित राहतात. पूर्वी लग्नाची मंगलाष्टके म्हणण्यात चढाओढ लागत असे. एक मंगलाष्टक संपले कि दुसरे मंगलाष्टक म्हणण्याची संधी साधण्यासाठी उपस्थितांकडून धडपड केली जात असे. हल्ली काही विवाह सोहळ्यांना तर केवळ मंगलाष्टके म्हणण्यासाठी वाद्यवृंद आणि गायक बोलावले जातात. त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. . वधूवरांनी एकमेकांना पुष्पहार घालून झाल्यावर त्यांच्या मस्तकावर अक्षता वाहण्याची पद्धत आहे; मात्र अनेक जणांना याविषयी पुरेशी माहिती नसल्याने मंगलाष्टके म्हणतानाच अक्षता उधळल्या जातात.

परिणामी अक्षता वधू वरांच्या मस्तकावर न पडता कार्यक्रमस्थळी सर्वत्र विखुरल्या जातात. अशा ठिकाणी वावरताना त्या पायाखाली येतात. यामध्ये अक्षतांची नासाडीही होते आणि अवमानही होतो. वधू-वरांनी एकमेकांना पुष्पहार घालणे हा विवाहातील एक महत्वाचा क्षण असतो. त्यालाही मनोरंजक करण्यासाठी हल्ली वधू-वरांना उगाचच उंचावर उचलून सहजपणे हार न घालू न देण्यासाठी आटापिटा केला जातो. ज्यामुळे त्यातील धार्मिकता निघून जाऊन तो केवळ मनोरंजनाचा क्षण बनतो. स्वागत समारंभासाठी परिधान करण्यात येणारे हिंदू वधु-वरांचे कपडेही हल्ली पाश्चात्य पद्धतीने शिवण्याची प्रथा पडू लागली आहे. त्यामुळे सकृतदर्शनी विवाह ख्रिश्चनांचा आहे कि हिंदूंचा हा उपस्थितांनाही प्रश्न पडतो. हल्ली विवाह विधी पार पडल्यानंतर सर्वांना एकत्र गोळा करून त्यांच्या समक्ष वधु-वरांकडून महागडा केक कापला जातो. हिंदू धर्मात शिजलेल्या अन्नपदार्थांवर सूरी फिरवणे वर्ज्य मानले जाते. त्यामुळे विवाहासारख्या सात्विक कार्यक्रमामध्ये अशी असात्त्विक कृती करणे अयोग्यच म्हणावे लागेल.

हल्ली लग्नाच्या सिद्धतेसाठी अधिक वेळ द्यायला नको म्हणून इव्हेन्ट मॅनेजमेंट कंपनीला लाखो रुपये देऊन कंत्राट दिले जाते. ही कंपनी विवाहातील धार्मिक विधींना अधिक महत्व न देता सोहळा अधिकाधिक मनोरंजक आणि आकर्षक कसा होईल याकडे अधिक लक्ष देतात. त्यामुळे अनेक ठिकाणी धार्मिक विधी चालू असताना दुसरीकडे सिनेसंगीत चालू असते. त्यामुळे उपस्थितांचे अधिक लक्ष त्याकडेच जाते. विवाह विधी सुरु असताना जी शांतता अपेक्षित असते ती न पाळता सर्वत्र गोंगाटाचे वातावरण असते. आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी याच कंपन्यांकडून वधु-वरांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे सिनेगीतांवर नृत्य बसवले जातात, विवाह विधीनंतर त्याचे विशेष सादरीकरण असते. स्टेजवर लोकांसमोर नाचायचे आहे, तर सर्व व्यवस्थितच व्हायला हवे यासाठी अनेक जवळचे नातेवाईक लग्नाच्या तयारीत हातभार लावण्यापेक्षा या नृत्याच्या तयारीतच अधिक व्यस्त असतात. विवाह विधी हा वर आणि वधु या दोहोंच्या नातेवाईकांसाठी आनंदाचा विधी असतो, त्यामुळे विवाहाप्रित्यर्थ उपस्थितांना प्रीती भोजन दिले जाते. हे भोजन वधु वरांच्या कुटुंबाच्या ऐपतीनुसार दिले जायला हवे; मात्र इथेही आत्मप्रौढीसाठी भोजनात नको तितक्या पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. काही ठिकाणी भोजनासाठी शाकाहार आणि मांसाहार असे वेगवेगळे कक्ष उभारले जातात. याशिवाय चायनीज, इटालियन पदार्थांचे कक्ष उभारण्याचीही पद्धत हल्ली रूढ होत चालली आहे. शहरी भागांत भोजनासाठी सर्रास 'बुफे' पद्धत अवलंबली जाते, ज्यामध्ये आपले ताट स्वतःहून वाढून घ्यायचे असते. बऱ्याचदा उपस्थित मंडळी आपल्या भुकेचा अंदाज न घेता केवळ समोर ठेवले आहेत म्हणून नको तितके पदार्थ ताटात वाढून घेतात आणि संपवता न आल्याने त्यातील काही पदार्थ ताटातच अर्धवट खाऊन सोडून देतात. दरवर्षी लगीन सराईमध्ये असे कितीतरी टन अन्न केवळ ताटात अर्धवट सोडून दिल्यामुळे वाया जाते. आज भारतात असाही वर्ग आहे ज्यांना प्रतिदिन २ वेळचे पोटभर अन्न मिळणे दुरापास्त आहे. अशा भारतात जेवण ताटात सोडून वाया घालवणे म्हणजे अन्नदेवतेचा अवमान नव्हे का ? अशा प्रसंगी भोजनाकरीता भारतीय पंगत अधिक योग्य ठरते; मात्र तिलाच आज 'आऊटडेटेड' ठरवण्यात आले आहे. विवाहानंतर मंजुळ आवाजाच्या पारंपरिक वाद्यांनीशी वधु -वरांची वरात काढण्याची प्रथा लोप पावत चालली आहे. हल्ली वरातीसाठी डीजे, बेण्डबाजा आणि कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीसाठी हजारो रुपये उधळले जातात. याशिवाय मित्र मंडळींना मद्याच्या आणि मांसाहाराच्या मेजवान्या देण्यासाठी खर्च होतो तो वेगळाच. विवाह सोहळा म्हणजे खरेतर वधु-वरांचा उत्सव, मात्र त्यातही हल्ली नातेवाईकांचे मानापमान नाट्य पाहायला मिळते. वर किंवा वधूच्या आईवडिलांनी मनासारखे कपडे किंवा दागिने घेतले नाहीत, पत्रिकेत नाव टाकले नाही म्हणून ऐन लग्नातही नातेवाईकांचे रुसवे फुगवे सुरु असतात. यांचा मान राखण्यासाठी पुन्हा वेगळा खर्च केला जातो. लग्न सोहळ्यासाठी खरेतर आपल्या ऐपतीप्रमाणेच खर्च केला जावा; मात्र 'लोकांना काय वाटेल' या विचाराने वर-वधूच्या कुटुंबियांकडून लग्न सोहळा दिमाखात पार पडावा यासाठी कर्ज काढून नको त्या गोष्टीसाठी नको तेव्हढा खर्च केला जातो. त्यामुळे विवाह संस्कारातील धार्मिक विधी राहतात बाजूला आणि अनावश्यक बाबींसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो.

लग्नानंतर गृहस्थाश्रम आरंभ होतो. नवा संसार उभा करण्यासाठी जागोजागी धनाची निकड भासते; मात्र वधु-वरांची सुरुवातीची काही वर्षे लग्नासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते फेडण्यातच व्यय होतात. विवाह संस्कारामध्ये केवळ धार्मिक विधींना महत्व असून आपल्या इभ्रतीखातीर त्याला लावण्यात आलेल्या उपरोक्त बाबींचा मुलामा निव्वळ दिखाव्यासाठी असतो. पूर्वी अनोळखी व्यक्तींसोबत विवाह संस्कार करून केलेले विवाहही पुढे आयुष्यभर टिकून राहात असत, त्यामुळे घटस्फोट नावाचा प्रकार त्यावेळी अस्तित्वातच नव्हता. 'घटस्फोट' हा शब्दही केवळ पती पत्नीमधील नाते संपवण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणारा शब्द आहे त्यामुळे हिंदू धर्मशास्त्रात या किंवा अशा अर्थाच्या कोणत्याच शब्दाचा उल्लेख नाही. हल्ली घटस्फोटांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यामागे अनेक कारणे असली तरी विवाह संस्कारांना दिले जाणारे दुय्यम महत्व याचाही इथे उल्लेख करावासा वाटतो. लोकांना, नातेवाईकांना काय वाटेल या विचाराने आपण कर्जबाजारी होऊन लग्न सोहळे साजरे करत असू तर हेच लोक नंतरही आपल्याला नावे ठेवणारच आहेत हे लक्षात घ्यायला हवे. विवाह संस्कारांत शिरलेल्या अनिष्ट प्रथांचे समूळ उच्चाटन झाले कि त्यासाठी केला जाणारा अवास्तव खर्चही वाचेल. यासाठी सर्वांनीच पुढाकार घेऊन विवाह संस्कारात परंपरागत विधींना प्राधान्य द्यायला हवे.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

◆ पान १ वरून पुढे...

## लाचखोर पीएसआयच्या...

दागदागिने, मालमत्तेची कागदपत्रे आढळून आली. रात्री उशिरापर्यंत ही मोजदाद सुरु होती. एखाद्या पोलीस उपनिरीक्षकाच्या घरात इतकी मोठी रोकड आढळून येण्याची ही पहिलीच वेळ आहे.

प्रमोद चिंतामणी याने लाचेची मागणी करताना १ कोटी त्याच्यासाठी व १ कोटी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांसाठी मागणी केली होती. त्यामुळे त्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचीही लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी केली जाणार आहे. पिंपरी चिंचवड पोलीस दल तसेच अनेक मोठ्या शहरातील आर्थिक गुन्हे शाखेत गुंतवणुकीच्या बाबतीत कोट्यावधीच्या फसवणुकीच्या गुन्ह्यांचा तपास सुरु असतो. कागदपत्रे किचकट असल्याच्या नावाखाली अनेकदा केवळ गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ केली जाते. तसेच गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपींवर कारवाई करताना फिर्यादीला जेरीस आणले जाते. आरोपींना वेगवेगळ्या प्रकारे सुट देण्याच्या नावाखाली मोठा मलिदा मिळविला जात असल्याचे बोलले जाते. प्रमोद चिंतामणी याच्यावरील कारवाई या चर्चेला पुष्टी मिळाली आहे. प्रमोद चिंतामणी याला सोमवारी न्यायालयात हजर करुन अधिक तपासासाठी पोलीस कोठडी घेण्यात येणार आहे.

## लाडक्या बहिणींसाठी...

माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

ई केवायसी करण्याचं आवाहन- महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरू असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या मार्गक्रमण करत आहे. ही वाटचाल अशीच अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी मागील महिन्यापासून https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर E-KYC सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व लाडक्या बहिणींनी १८ नोव्हेंबरचा आधी E-KYC प्रक्रिया पूर्ण करावी ही नम्र विनंती, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांसाठी

◆ पान १ वरून पुढे...

ई-केवायसी करणं आवश्यक करण्यात आलं आहे. राज्य सरकारचा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ पात्र लाभार्थी महिलांपर्यंत पोहोचवण्याचा आहे. त्यासाठी विविध मार्ग अवलंबल्यानंतर ई केवायसी सुरु करण्यात आली आहे. ई केवायसी करत असताना महिलांना त्यांचा आधार क्रमांक आणि वडिलांचा किंवा पतीचा आधार क्रमांक द्यावा लागतो. ही केवायसी १८ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी लागणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सुरुवात जुलै २०२४ पासून करण्यात आली आहे. तेव्हापासून लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. तर, ज्या शेतकरी महिला नमो शेतकरी महासन्मान आणि पीएम किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेतात त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा ५०० रुपये दिले जातात.

## स्व.संपदा मुंडे....

बीडचे पालकमंत्री अजित दादांची भेट घेऊन या प्रकरणाची माहिती देत न्याय देण्याची मागणी केली आहे. यासोबतच खा.बजरंग बप्पा सोनवणेही हा मुद्दा संसदेत लावून धरणार आहेत. महाराष्ट्राच्या लेकीला न्याय मिळाला पाहिजे. आम्ही मुंडे कुटुंबा सोबत शेवटपर्यंत आहोत. या प्रकरणात कोणताही राजकीय दबाव नसला पाहिजे. जो गलत है वो गलत हैं. आम्ही दिल्लीतही याचा पाठपुरावा करू. सीडीआरचे रिपोर्ट लीक कसा झाला? महाराष्ट्रात गलिच्छ राजकारण कुठून सुरू झालं? हे तपासलं पाहिजे. यात राजकीय दबाव येऊ देणार नाही. जो कोणी असेल त्याला शिक्षा झालीच पाहिजे. असेही खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे बीड जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

ज्ञानेश्वरी मुंडेंची घेतली भेट-- खा.सुप्रिया सुळे यांनी स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचा फोनवर संवाद झाल्यानंतर खा. सुळेंनी आज बीडमध्ये ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेतली. ३१ जुलै रोजी या प्रकरणात आयपीएस पंकज कुमावत यांच्या नेतृत्वात एसआयटीची स्थापना करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास गेले तीन महिन्यांपासून एसआयटी करत

◆ पान १ वरून पुढे...

आहे आणि याच बाबतीत खा.सुप्रिया सुळे यांनी मुंडे कुटुंबीयांकडून माहिती घेतली. अद्याप या प्रकरणात आरोपी निष्पन्न झाले नाहीत, या प्रकरणाचा तपास एसआयटी कडून सुरूच आहे. या अनुषंगाने खा.सुप्रिया सुळे यांनी एसायटीचे प्रमुख पंकज कुमावत यांच्याकडून आढावा घेतला. यासोबतच आ.संदीप क्षीरसागर यांनीही पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याकडून याप्रकरणाची माहीती घेतली.

## भरधाव ट्रकने....

चालक कल्याण मीणा हा विराटनगरचा रहिवासी आहे आणि त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांचे म्हणणे आहे की अपघातापूर्वी सुमारे दीड किलोमीटर अंतरावर पेट्रोल पंपाबाहेर डंपर चालकाचा कार चालकाशी वाद झाला होता.

हेड कॉन्स्टेबल रवींद्र म्हणाले की, डंपर रिकामा होता. ते रोड क्रमांक १४ कडे जात होते. लोहा मंडी रोडवर सुमारे ३०० मीटर अंतरापर्यंत वाहने चिरडत नेली. लोकांना रुग्णवाहिकेने रुग्णालयात नेण्यात आले. पोलिसांनी सांगितले की, घटनास्थळापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर पेट्रोल पंपाबाहेर डंपर चालकाचा कार चालकाशी वाद झाला. त्यानंतर, मद्यधुंद चालक डंपर घेऊन पळून गेला. चुकीच्या बाजूने गाडी चालवत असताना त्याने एका दुचाकीला धडक दिली. दुचाकीला धडक दिल्यानंतर नागरिकांनी पाठलाग सुरू केला. चालकाने डंपर वेगाने चालवत राहिला. अपघातानंतरही जयपूरच्या लोहा मंडी रोडवर ओव्हरलोड माल वाहून नेणारे ट्रेलर दिसले. अपघातानंतर संतप्त लोकांनी असाच एक ट्रेलर थांबवला. पोलिसांचे म्हणणे आहे की अपघाताचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे, ज्यामध्ये डंपर चालक १०० किमीपेक्षाही जास्त वेगानेचालवत असल्याचे, वाहनांना धडक देत लोकांना चिरडताना दिसत आहे. घटनास्थळी उपस्थित असलेले राकेश कुमार जांगिड आणि रामदयाल मीणा यांनी सांगितले की, अपघात त्यांच्या समोरच घडला. रस्त्याच्या चुकीच्या बाजूने येणाऱ्या डंपरने प्रथम चौकात एका दुचाकीला चिरडले आणि नंतर स्विफ्ट कारसह तीन वाहनांना चिरडले. डंपर इतक्या

◆ पान १ वरून पुढे...

वेगाने जात होता की रस्त्यात दिसेल त्याला चिरडत गेला.

## महिला डॉक्टरचे...

अजित पवार कोणत्या रुपात अडकलेत? असा प्रश्नही त्यांनी विचारला. मुख्यमंत्री फडणवीस हे रणजीतसिंह निंबाळकर यांना कशी काय क्लीनचीट देऊ शकतात? चौकशीत ते जर निर्दोष असतील तर हरकत नाही. अशा प्रकारची माणसं तुमच्या भोवती गोळा होत असतील तर पक्ष बदनाम होणारच. जयकुमार गोरे यांच्यावरही प्रकाश महाजन यांनी टीका केली. ते म्हणाले की, जयकुमार गोरे यांनीही मृत महिलेच्या चॅटिंगवर भाष्य करत तिचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. जयकुमार गोरे यांचं लोकांनी काय काय दाखवलं नाही? ज्या महिलेला एक कोटी रुपये देताना ट्रॅप करण्यात आलं ते एक कोटी गोरेंकडे कसे आले हे ईडीने त्यांना विचारलं. त्यांच्या दृष्टीने स्त्री जर फक्त उपभोगाची वस्तू असेल तर त्यांच्या तोंडून हे वक्तव्य येणार. हे कोणीही मूळ भाजपचे नाहीत, ते बाहेरून आले आहेत, त्यांनी बाहेरून येताना हा रोग आणला.

राज्याचा एक मंत्री असं कसं काय बोलू शकतो? समजा त्या महिलेची चॅटिंग असेल तर तुम्ही काय तिला आत्महत्या करायला लावणार का? असा प्रश्न प्रकाश महाजन यांनी विचारला. गोपीनाथ मुंडे यांच्या वारस कोण यावर बोलणाऱ्या पाशा पटेल याना देखील महाजनानी सुनावलं. कोण पाशा पटेल? तो उपटसुंभ अशी टीका महाजन यांनी केली. ते म्हणाले की, पाशा पटेल इतका मतलबी आणि संधीसाधू माणूस सापडणार नाही. ज्यावेळेस गोपीनाथ मुंडे यांचे निधन झालं आणि त्यांचं पार्थिव परळीत आलं, तेव्हा धनंजय मुंडेनी अंत्यसंस्कार करावे असं म्हणणारा पाशा पटेल होता. त्यानां माहिती नाही का गोपीनाथ मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याविषयी धनंजय मुंडे यांनी काय उद्गार काढले होते. त्यामुळे तो कसं काय वारस होऊ शकतो? पाशा पटेल यांना त्यांची मुलं वारस ठरवतील का हे बघावं. गोपीनाथ मुंडे यांचा वारसा ठरवण्याचा हक्क हा त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांना आणि ओबीसी वर्गाला आहे.. गोपीनाथ मुंडे यांचा वारसा फक्त पंकजा मुंडेच आहेत, दुसरं कोणी नाही असं प्रकाश महाजन म्हणाले.

◆ पान ४ वरून पुढे...

## गोरक्षनाथ प्रगट...

महाराज यांच्या हस्ते करण्यात आली ह भ प गुरुवर्य किसन बाबा महाराज व ह भ प गुरुवर्य साधू बाबा महाराज यांच्या आरती झाल्यानंतर दत्तगुरु माऊली यांची महाआरती करण्यात आली आणि महाआरतीनंतर भाविक भक्तांच्या महाप्रसादाच्या पंगती बसल्या व संत महंत महंत भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये गोरक्षनाथ महाराज प्रगट दिन श्री शेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी परिसरातील भाविक हजारोच्या संख्येने उपस्थित होते भाविक भक्तांनी रांग लावून गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांचे गोरक्षनाथ प्रकट दिनानिमित्त दर्शन व आशीर्वाद घेतले श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गोरक्षनाथ महाराज प्रगट दिन साजरा करण्यात आला या दिवसाची महाप्रसादाचे यजमान श्री दादासाहेब आदिनाथ लांडे, सरपंच घाटसावळी ,सखाराम राधाकिसन लांडे ,महादेव विष्णू लांडे ,सुंदर मोतीराम लांडे गोरक्षनाथ महाराज प्रकट दिनानिमित्त महापंक्तीचे यजमान होते अशा पद्धतीने हजारोच्या संख्येने श्री शेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गोरक्षनाथ महाराज प्रगट दिन उत्साहात साजरी करण्यात आला

## अडीच वर्षांपासून...

जिल्हा रुग्णालयात सध्या ३२० खाटांची क्षमता असून ४५० हून अधिक रुग्ण उपचार घेत असतात. प्रसूती व सिझेरियन प्रकरणांमध्ये बीड जिल्हा राज्यात अग्रस्थानी आहे. परंतु जागेअभावी अनेक गर्भवती महिलांना खाट मिळत नाही – ही प्रशासनाची लाजिरवाणी बाब आहे. त्यामुळे फर्निचर व लिफ्टसाठी तातडीने निधी मंजूर करावा या मागणीसाठी दि.१० नोव्हेंबर (सोमवार) रोजी जिल्हा रुग्णालयाच्या आवारात अजितदादा के नाम पे दे दे बाबा भिक मांगो लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा डॉ. ढवळे यांनी दिला आहे. या संदर्भात त्यांनी पालकमंत्री अजितदादा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर व जिल्हा प्रशासनाला निवेदनही दिले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## कृषी समृद्धी...

टोकन यंत्र, नैसर्गिक/सेंद्रिय शेतीस प्रोत्साहनसाठी टेन ड्रम थिअरी, सामूहीक कांदा साठवण ५०० मे.टन क्षमतेची उभारणी, काढणी पश्चात शेतमाल सुकवणे सुविधा करिता इलेक्ट्रिक हॉट एअर ड्रायर उभारणी, काढणी पश्चात शेतमाल साठवण सुविधा करिता गोदाम १००० किवा २००० मे.टन क्षमतेनुसार उभारणी व सीताफळ/आंबा/जांभुळ पल्प मशीन ७) कृषी समृद्धी योजनेतील घटकाचे अनुदान देताना केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निकष व मापदंडानुसार थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) तत्वावर तसेच कृषी विभाग, आत्मा, स्मार्ट, रेशीम विभाग, पशुसंवर्धन विभाग व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडील प्रचलित योजनेच्या मार्गदर्शन सुचनेनुसार डीबीटी तत्वानुसार अमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे शेती उपयोगी फवारणी यंत्र ड्रोन, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी बीड कार्यालय येथे मिल्क मशीन, जिल्हा रेशीम विकास अधिकारी बीड या कार्यालयात णसीरवरींळेपे ष लहरुज्ञळ उशर्पीश, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड कार्यालय येथे पल्प मशीन व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय बीड येथे शेती उपयोगी फवारणी यंत्र ड्रोन, टोकन यंत्र, टेन ड्रम थिअरी, सामूहीक कांदा साठवण ५०० मे.टन, इलेक्ट्रिक हॉट एअर ड्रायर उभारणी, गोदाम १००० किवा २००० मे.टन करिता अर्ज सादर करावेत. सदर अर्ज सादर करताना जिल्ह्यातील वैयक्तिक लाभार्थी, आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, उमेद अभियान अंतर्गत स्थापित महिला ग्राम संघ यांनी जास्तीत जास्त अर्ज दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ अखेर सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड एस.एम.साळवे यांनी केले आहे.

## तलवाडा जिल्हा...

की आम्ही गेल्या आणेक पंचवार्षिक जिल्हा परिषद निवडनुकित मराठा, ओबीसी, व ईतर आदरकाष्ट ऊमेदवारांना या गट व गणातुन प्रतिनिधित्व करण्याची संधी देत आलेलो आहोत. या वेळी मात्र मुस्लिम समाजाला

◆ पान ४ वरून पुढे...

प्रतिनिधित्व देण्याची मागणी व आमची ईच्छा आहे. आस्या प्रकारे मतदारातुन प्रतिक्रिया मिळत आसल्याने सय्यद मुख्तार अली यांच्या नावाच्या होत आसलेल्या चर्चेला अनुसरुण भारतीय जनता पार्टीच्या वतीने तलवाडा जिल्हा परिषद गटा साठी ऊमेदवार म्हणून सय्यद मुख्तार अली हे सर्व समावेशक चेहरा आसल्याचे जोमाने समोर येत आहे.

## जिल्ह्यामध्ये मनाई...

किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## धम्मनिती आपल्या...

केला, कारण ते सत्य, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीवर विश्वास ठेवतात. धम्मनिती ही आपल्या सर्व सामाजिक आणि वैयक्तिक समस्यांचे उत्तर आहे.असे मत डॉ.उमेश बगाडे यांनी व्यक्त केले. बीड शहरातील हॉटेल

◆ पान ४ वरून पुढे...

निलकम येथे, फुले-आंबेडकर विचार सभेकडून रविवार (ता.२) नोव्हेंबर रोजी बुद्ध आणि त्यांचा धम्म समकालीन आकलन विषयावर धम्म चर्चा आयोजित करण्यात आली होती. या धम्म चर्चेत डॉ. प्रकाश सिरसट डॉ.उमेश बागडे, प्रकाश तुपे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे उदघाटन म्हणून जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे तर अध्यक्षस्थान डॉ.विक्रम धन्वे यांनी भूषविले. फुले-आंबेडकर विचार सभेचे संयोजक वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, डॉ. बी. एन. जावळे आणि ॲड. तेजस वडमारे होते. डॉ.उमेश बगाडे म्हणाले की, आजचा समाज ब्राह्मणवाद आणि भांडवलवादाच्या मुठीत अडकला आहे. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' मधील क्रांती आणि प्रतीक्रांती या संकल्पनांवर भाष्य करत सांगितले की, धम्म ही केवळ तत्त्वचर्चा नाही, तर व्यवहारातील समता आणि सामाजिक कल्याणाचा मार्ग आहे. धम्माचा आधार घेतल्याशिवाय नीती आणि न्याय शक्य नाही. असे विचार डॉ.उमेश बगाडे यांनी मांडले. या धम्म चर्चेचे प्रास्ताविक ॲड. राजेश शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक अनिल डोंगरे यांनी केले तर आभार ॲड. तेजस वडमारे यांनी मानले.या धम्म चर्चेत संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अभ्यासक, अधिकारी, वकील, फुले-आंबेडकर चळवतील विविध पक्षाचे पदाधिकारी बहूसंख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तर लोकशाही...

जिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण सहा तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## प्रेम, त्याग...

नसल्यास जीवनात समाधान मिळत नाही. म्हणून मन स्थिर झाले कीच इंद्रियांचे समाधान होते. चाकरवाडी या पवित्र स्थळी चालू असलेल्या हरिनाम सप्ताहात दररोज कीर्तन, प्रवचन आणि भजनाचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडत आहे. अनेक भागातून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिनामाचा आस्वाद घेत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाचे क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्याकडून अभिनंदन

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाने इतिहास रचत विश्वविजेतेपद पटकावले असून, त्यांच्या या अभूतपूर्व यशाने संपूर्ण देशाचे मस्तक अभिमानाने उंचावले असल्याच्या भावना व्यक्त करत क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी विश्वकप विजेत्या महिला क्रिकेट चमूला शुभेच्छा दिल्या. संपूर्ण देशभरात भारतीय नागरिक तिरंगा हाती घेऊन अभिमानाने विश्वविजयाचा आनंद साजरा करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मंत्री ॲड. कोकाटे यांनी संघाचे




अभिनंदन करताना म्हटले की, संधी मिळाली तर भारतीय मुली जग जिंकू शकतात, हे आपल्या महिला खेळाडूंनी सिद्ध करून दाखवले आहे. 'क्रिकेट इज अ जेंटलमन्स गेम' ही संकल्पना आज आपल्या रणरागिणींनी मोडीत काढली, असे सांगत ते म्हणाले की या विजयी महिलांनी जगाला दाखवून दिलं की जेंटलवूमनमध्ये देखील क्षमता, गुणवत्ता आणि संघर्षपूर्ण समानता आहे. भारतीय स्त्रिया आता चूल आणि मूल यापलीकडे जाऊन कर्तृत्वाच्या नव्या सीमारेषा गाठत आहेत. महिला क्रिकेट संघाच्या या विजयाने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की भारतीय मुली कोणत्याही अर्थाने मुलांपेक्षा कमी नाहीत. त्या अधिक जिद्दी, जाज्वल्य आणि समर्थ आहेत, असेही क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांनी म्हटले आहे.

# कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान, बालाघाट येथे भव्य उत्सव सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र.१०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांच्या कृपाशिर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त संस्थान, बालाघाट (कपिलधारवाडी-मांजरसुंबा) येथे बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त भव्य उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा उत्सव भक्तीभावाने आणि मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, सकाळी पहाटे महापूजा, अभिषेक, आरती व नामस्मरण कार्यक्रमाने



सोहळ्याची सुरुवात होईल.

दुपारी सर्व उपस्थित भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व श्रद्धाळू भक्तांना या पवित्र कार्तिक शुद्ध पौर्णिमा उत्सवाला उपस्थित राहून श्री दत्त महाराजांच्या कृपाशिर्वादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अन्नदाते म्हणून विक्रम माणिक वाघिरे, बंकट श्रीहरी वाघिरे आणि धर्मा दिनानाथ जगताप उदंडवडगाव (शिवाजीनगर) यांचे विशेष योगदान आहे.उत्सवाच्या तयारीसाठी स्थानिक ग्रामस्थ आणि श्रद्धाळू भक्त वर्ग उत्साहाने कार्यरत असून, परिसर भक्तिरसाने ओतप्रोत भरून गेला आहे.

# उदंचन जलविद्युत प्रकल्पांचे परवाने जलदगतीने मिळण्यासाठी फास्ट ट्रॅक यंत्रणा: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आठ हजार कोटींचा सामंजस्य करार

**मुंबई । प्रतिनिधी**

पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत (धुळे/नंदुरबार) प्रकल्पासाठी हरियाणा येथील जीएससी पीएसपी महा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आठ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. राज्य शासनाने उदचंन जलविद्युत प्रकल्पातील गुंतवणूकदारांना जलवापर आणि पर्यावरणीय मंजुरीसह इतर सर्व परवाने जलदगतीने मिळावेत, यासाठी 'फास्ट-ट्रॅक' यंत्रणा



उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, जीएससी पीएसपी महा प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सुमित नंदा, संचालक शुभ नंदा, मुख्य विपणन अधिकारी अनुप भटनागर, उपाध्यक्ष विमल सक्सेना, विधि सल्लागार विकास कुमार पाठक आदी उपस्थित होते. यावेळी दीपक कपूर आणि कंपनीचे अध्यक्ष सुमित नंदा यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये उदंचन जलविद्युत प्रकल्प राबवण्यासाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असल्याने महाराष्ट्राला मोठा लाभ मिळणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने ऊर्जा ग्रीड स्थिर ठेवण्यासाठी उदंचन जलविद्युत प्रकल्प (पंप्ड स्टोरेज प्रोजेक्ट्स) धोरणालाही वेग देण्याचा निर्णय घेतला आहे.

# 'सर्वाइकल कॅन्सर फ्री पुणे' अभियानाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'सर्वाइकल कॅन्सर फ्री पुणे' अभियानाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव डॉ.संतोष भोसले, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, जीविका फाउंडेशन, युनियन बँक, अमेरिका



- इंडिया फाउंडेशन या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. स्त्रियांमध्ये होणारा सर्वाइकल कॅन्सर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठ्या प्रमाणात आढळून येणारा आजार आहे. एचपीव्ही लस आणि वेळेवर केलेल्या स्क्रीनिंगमुळे या आजाराला प्रभावीपणे प्रतिबंध करता येऊ शकतो. त्यामुळे या आजाराच्या बाबतीत महिलांमध्ये जनजागृती करणे आणि लसीकरणाचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यावेळी अभियानासंदर्भात सादरीकरण केले.


या प्रकल्पाचा उद्देश सर्वाइकल कॅन्सरच्या संदर्भात प्रतिबंध,जनजागृती, लसीकरण आणि समायोजित स्क्रीनिंगच्या माध्यमातून कॅन्सरचं संपूर्णपणे निर्मूलन करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये लसीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आशा सेविकांकडून घराघरात जाऊन महिला वर्गासाठी सर्वाइकल कॅन्सर स्क्रीनिंगची माहिती दिली जाणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# भावणिक लिहुन रडवण्यापेक्षा विनोदी लेखनातुन हसवणे अवघड: प्रा. दासू वैद्य

## डॉ. गणेश कुटे यांच्या हस्यालॉजी पुस्तकाचे प्रकाशन

**बीड । प्रतिनिधी**

अलीकडच्या काळातील साहित्यात नवे नवे अनेक रस आले आहेत. करुण, शृगार, रौद्र, बीभत्स, भयानक, वीर अन् अद्भुत रसाची साहित्य निर्मिती होत आहे... परंतु, पु. ल. देशपांडे ते प्र. के. अत्रे यांचे स्मरण व्हावे, असे विनोदी लेखन कोणीही करताना दिसत नाही.. अशा काळात वैद्यकीय सेवा करणार्या डॉ. गणेश कुटे यांनी हस्यालॉजी हे विनोदी पुस्तक लिहीले आहे. खरेतर, भावणिक लेखन करून रडवणे



सोपे आहे परंतु, नर्मविनोदी लेखन करून हसवणे खुप अवघड आहे, असे प्रतिपादन प्रख्यात लेखक, कवि प्रा. दासू वैद्य यांनी केले. ते डॉ. गणेश कुटे लिखीत हस्यालॉजी या विनोदी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी बोलत होते. बीड येथे रविवारी (दि.२) स्त्रीरोग तज्ञ डॉ. गणेश कुटे यांच्या हस्यालॉजी पुस्तकाचे प्रकाशन प्रख्यात लेखक प्रा. दासु वैद्य, सिनेलेखक अरविंद जगताप, लेखक तथा पुणे येथील न्यु ईरा पब्लिकेशनचे प्रकाशक शरद तांदळे, आनंदग्रामचे दत्ता बारगजे व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

# परभणी जिल्ह्यातील 265 अंगणवाड्या स्मार्ट होणार : राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**परभणी । प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी 'स्मार्ट अंगणवाडी किट' खरेदीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत परभणी जिल्ह्यातील सुमारे २६५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, या केंद्रांचे रूपांतर आदर्श आणि



अत्याधुनिक सुविधांनी युक्त स्मार्ट अंगणवाड्यामध्ये करण्यात येणार आहे. महिला व बालविकास राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि पोषण या तिन्ही घटकांचा समन्वय साधणारी स्मार्ट अंगणवाडी ही एक नवी क्रांती ठरणार आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होईल. मुलांच्या सर्वांगीण विकासासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. परभणी जिल्ह्यासाठी ही अतिशय गौरवाची बाब असून २६५ अंगणवाड्या स्मार्ट होणार आहेत. या योजनेमुळे प्रत्येक अंगणवाडीत शिक्षण, आरोग्य, पोषण आहार, स्वच्छता व बालसंगोपनासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामुळे अंगणवाडी केंद्रांमध्ये मुलांसाठी आनंददायी, सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल. परभणी, सेलू, जिंतूर, पूर्णा, मानवत, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, पालम या सर्व तालुक्यांतील अंगणवाड्या या योजनेत समाविष्ट आहेत. यामुळे ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार असून स्थानिक अंगणवाड्या आधुनिक शिक्षण व आरोग्य विकासाचे केंद्र म्हणून विकसित होतील. या प्रकल्पामुळे बालकांच्या वाढीचा, आरोग्याचा व पोषणस्थितीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर होईल.

# यशवंत नगर, बीड येथे कार्तिकी एकादशीनिमित्त सांप्रदायिक भजन सोहळा उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशीनिमित्त यशवंत नगर येथे भक्तिमय वातावरणात सांप्रदायिक भजनाचा भव्य सोहळा काल दिनांक २/११/२५रविवारी रात्री ७ते १० या वेळेत संपन्न झाला. ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे आणि ह.भ.प. गोकुळ महाराज तुपे शास्त्री यांच्या संयोजनात तसेच आयोजक तुकाराम पंत जोशी यांच्या पुढाकाराने या भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत नामस्मरणाने व विठ्ठल रुक्मिणी पूजा करून झाली. त्यानंतर ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांनी भगवान विठ्ठलाच्या महिम्याचे सखोल वर्णन करत भाविकांना अध्यात्मिक विचारांनी प्रबोधन केले. ह.भ.प. गोकुळ महाराज शास्त्री यांनी आपल्या सुमधुर वाणीतून अभंग गायन केले व भक्तीमार्गाचे महत्व सांगितले.

भजन सत्रात सुमधुर अभंग गायन सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांत भक्तीचे अश्रू आणले. त्याचबरोबर गवळणी आणि भारदार कार्यक्रमांनी वातावरण आणखी रंगतदार बनवले. एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाल्मीक चाटे आणि मुकुंद भुतपल्ले यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमात यशवंत नगर परिसरासह बीड शहर व आसपासच्या भागातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमानंतर आयोजक तुकाराम पंत जोशी आणि परिवार यांच्या हस्ते उपस्थित मान्यवर व प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सर्व भाविकांसाठी प्रसादरूप फराळाचे आयोजन करण्यात आले होते.

# अभिनेत्री दया डोंगरे यांचं निधन; मराठी रंगभूमी आणि सिनेसृष्टीतील प्रतिभाशाली चेहरा काळाच्या पडद्याआड

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील एक मानाचं नाव असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचं वयाच्या ८५व्या वर्षी निधन झालं आहे. वृद्धापकाळामुळे त्यांची प्राणज्योत मालवली. 'मायबाप', 'खट्याळ सासू नाठाळ सून' आणि 'उंबरठा' यांसारख्या उल्लेखनीय चित्रपटांम



धील त्यांच्या दमदार भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. त्यांच्या निधनाने मराठी कलाविश्वात शोककळा पसरली आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीला दया डोंगरे यांचा कल संगीत क्षेत्राकडे होता. आकाशवाणी गायन स्पर्धेत त्यांनी उत्तम यश मिळवत आपली ओळख निर्माण केली होती. मात्र पुढे अभिनयाची ओढ अधिक असल्याने त्यांनी रंगभूमीकडे वळण घेतलं आणि तिथे त्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं. अभिनयाचं बाळकडू त्यांना त्यांच्या आई, अभिनेत्री यमुताई मोडक यांच्याकडून आणि आत्या, गायिका-अभिनेत्री शांता मोडक यांच्याकडून मिळालं होतं. केवळ १६ व्या वर्षी मो. ग. रांगणेकर यांच्या 'रंभा' या नाटकातून त्यांनी रंगभूमीवर पदार्पण केलं आणि पहिल्याच भूमिकेत त्यांच्या अभिनयाचं कौतुक झालं.

११ मार्च १९४० रोजी अमरावती येथे जन्मलेल्या दया डोंगरे यांनी बालपणाचा काही काळ कर्नाटकातील धारवाड येथे व्यतीत केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अभिनयाचं शास्त्रोक्त शिक्षण घेण्यासाठी दिल्लीतील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा मध्ये प्रवेश घेतला होता. मात्र विवाहानंतर त्यांचं शिक्षण अपूर्ण राहिलं.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री.ए.एम.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २०४/२०२५

अशोक सखाराम चोबे वि. निरंक

ज्यापेक्षा सखाराम पि. भानुदास चोबे, हे दिनांक ०८.०७.२०२३ रोजी धावज्याचीवाडी. येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार- १ अशोक पि. सखाराम चोबे, वय-५७ वर्षे, रा. धावज्याचीवाडी ता.जि.बीड २ दगडाबाई भ्र. सखाराम चोबे, वय-८२ वर्षे, रा. धावज्याचीवाडी ता.जि.बीड ३ प्रयाग भ्र. वसंत काटे, वय-४२ वर्षे, रा. धावज्याचीवाडी ता.जि.बीड

४ शालनबाई भ्र. शहादेव कदम, वय - ६१ वर्षे, रा. पिराचीवाडी ता.जि.बीड, ५. मालन भ्र. मारूती काटकर, वय-४४ वर्षे, रा. धावज्याचीवाडी ता.जि.बीड

अर्जदार नं. १ हा मयत नामे सखाराम पि. भानुदास चोबे, यांचा मुलगा आहे. तसेच अर्जदार २ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत सखाराम पि. भानुदास चोबे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख २९/०३/२०२५ आहे.

आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

(ॲड. शेळके वाय.आर यांच्या मार्फत)
(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३९८ / २०२५

अर्जदार- १) राजेंद्र पि. अंबादास गिराम, वय- ५४ वर्षे, धंदा-शेती, रा. नाथापुर, ता. जि. बीड. २) पदमाकर पि. अंबादास गिराम, वय- ५२ वर्षे, धंदा-शेती, रा. नाथापुर, ता. जि. बीड. ३) द्वारकाबाई भ्र. अंबादास गिराम, वय- ७९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. नाथापुर, ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे अंबादास पि. रंगनाथ गिराम यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे अंबादास पि. रंगनाथ गिराम, रा. नाथापुर, ता. जि. बीड हे दिनांक २५/०९/२०१४ रोजी नाथापुर, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३ ही मयताची पत्नी आहे. मयत अंबादास पि. रंगनाथ गिराम यांचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक १५/०४/२०२५

आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(ॲड. शेळके वाय. आर.यांच्यामार्फत)

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६५२/२०२५,

कैकयी भ्र. देविदास तोडेकर वि. निरंक

ज्यापेक्षा साहेबराव उर्फ साहेबा पि. भाऊराव तोडेकर हे दिनांक १६.०१.२०११ रोजी मेंगडेवाडी, पो. च-हाटा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार- १. कैकयी भ्र. देविदास तोडेकर, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. मेंगडेवाडी, पो. च-हाटा, ता. जि. बीड, २. दादाराव पि. देविदास तोडेकर, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. मेंगडेवाडी, पो. च-हाटा, ता.जि. बीड, ३. सोमनाथ पि. देविदास तोडेकर, वय २२ वर्षे, धंदा शेती, रा. मेंगडेवाडी, पो. च-हाटा, ता.जि. बीड

अर्जदार क्रं. १ ही मयत नामे साहेबराव उर्फ साहेबा पि. भाऊराव तोडेकर यांची सून आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे मयताचे नातू आहेत. मयत साहेबराव उर्फ साहेबा पि. भाऊराव तोडेकर यांचा मुलगा नामे देविदास पि. साहेबराव तोडेकर हे पुर्वीच मयत झाले आहे, मयताची पत्नी नामे आसराबाई भ्र. साहेबराव तोडेकर या देखील दि. १७/०३/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. मयताचे आई-वडील हे यापूर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत साहेबराव उर्फ साहेबा पि. भाऊराव तोडेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ११/१२/२०२५ आहे.

आज दिनांक ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. (ॲड. के.व्ही. दाभाडे यांच्यामार्फत)

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● मंगळवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२५ ● पान ४


# गोरक्षनाथ प्रगट दिन उत्साहात साजरा



## गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा यांची भव्य पालखी मिरवणूक

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे नाथपरंपरेतील नवनाथांपैकी तपस्वी नाथ गुरुवर्य गोरक्षनाथ महाराज यांच्या प्रगट दिना निम्मित सोमवारी दि ०३ नोव्हेंबर रोजी गोरक्षनाथ टेकडी येथे भव्य प्रगटदिन महासोहळा ह भ प गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.सकाळी पहाटे ०४ वाजता गोरक्षनाथ टेकडी येथे गोरक्षनाथ प्रगट दिन कार्यक्रमास सुरुवात झाली, गुरु शिष्य परंपरेत सुरू असणारी परंपरा गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या पालखी सोहळ्याने सुरू झाली श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे नवनाथ बाबा महाराज यांची पालखीतून मिरवणूक भाविक भक्तांनी काढली पालखी सोहळा झाल्याच्या नंतर गोरक्षनाथ महाराज यांचा महा अभिषेक गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते करण्यात आला नंतर गोरक्षनाथ महाराज यांची महाआरती गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा ▶▶ उर्वरित पान २ वर

# अडीच वर्षांपासून २१ कोटींचे माता-बाल रुग्णालय निधीअभावी धुळ खात

## अजितदादा के नाम पे दे दे बाबा – भिक मांगो आंदोलनाचा इशारा : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

सन २०१६-१७ मध्ये जिल्हा रुग्णालयाच्या आवारात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तब्बल २१ कोटी रुपये खर्चून उभारलेले माता व बाल रुग्णालय आजही निधीअभावी सुरू न होता धुळखात पडले आहे. कंत्राटदार व बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे २०२३ पर्यंत बांधकाम पूर्ण व्हायलाच उशीर झाला, आणि आता गेल्या अडीच वर्षांपासून लिफ्ट, फायर फायटिंग,



विद्युतीकरण व फर्निचरच्या कामांसाठी निधी न मिळाल्याने ही इमारत वाऱ्यावर पडली आहे. या दुर्लक्षाविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीकडून ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्यातून फायर फायटिंग व विद्युतीकरणाची कामे पूर्ण झाली आहेत. तथापि, फर्निचर आणि लिफ्ट स्थापनेसाठी अद्याप निधी मिळालेला नाही. परिणामी ही १०० खाटांची आधुनिक इमारत आजही वापरात येऊ शकलेली नाही. डॉ. गणेश ढवळे म्हणाले – ▶ उर्वरित पान २ वर

# कृषी समृद्धी योजनेअंतर्गत अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण करणे, मूल्य साखळी बळकट करणे, तसेच हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, हा कृषी समृद्धी योजनेचा मुख्य उद्देश आहे.

राबविण्यात येणाऱ्या बाबी – शेती उपयोगी फवारणी यंत्र ड्रोन, टोकन पद्धतीने पेरणीस प्रोत्साहन देण्यासाठी टोकन यंत्र, नैसर्गिक/सेंद्रिय शेतीस प्रोत्साहनसाठी टेन ड्रम थिअरी, सामूहीक कांदा साठवण ५०० मे.टन क्षमतेची उभारणी, काढणी पश्चात शेतमाल




सुकवणे सुविधा करिता इलेक्ट्रिक हॉट एअर ड्रायर उभारणी, काढणी पश्चात शेतमाल साठवण सुविधा करिता गोदाम १००० ते २००० मे.टन क्षमतेनुसार उभारणी, मिल्क मशीन, णसीरवरींळेप ष लहरुज्ञळ उशर्पीश व सीताफळ/आंबा/जांभुळ पल्प मशीन इत्यादी.

कृषि समृध्दी योजनेची ठळक वैशिष्ट्ये : १) उत्पादकता, शाश्वतता आणि उत्पन्न वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख कृषी गुंतवणूक क्षेत्रांना प्राधान्य दिले जाईल. २) हवामान बदल अनुकूल शेती पद्धतीस प्रोत्साहन देण्यात येईल. यामध्ये सूक्ष्म सिंचन, हवामान अनुकूल बियाणे, पिकांचे वैविध्य, जमिनीची सुपीकता व्यवस्थापन, कमी खर्चीक यांत्रिकीकरण व मजबूत मूल्यसाखळी तयार करण्यावर भर दिला जाईल. ३) शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्यात येईल. ४) निर्यात वृद्धीच्या दृष्टीने गुंतवणुकीस प्रोत्साहन दिले जाईल. ५) वैयक्तिक लाभ – शेती उपयोगी फवारणी यंत्र ड्रोन, मिल्क मशीन व Upgradation of chawki Centre. ६) सामुहिक लाभ (आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, उमेद अभियान अंतर्गत स्थापित महिला ग्राम संघ) – शेती उपयोगी फवारणी यंत्र ड्रोन, ▶ उर्वरित पान २ वर

# तलवाडा जिल्हा परिषद गटा साठी सय्यद मुख्तार अली सर्व समावेशक चेहरा !

**तलवाडा । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील विविध नगर पालिका व नगर परिषदच्या होत आसलेल्या निवडनुकापुर्वीच गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडनुकिच्या आणुषंगाने विविध पक्षाच्या वतीने ईच्छुक ऊमेदवारांनी आप आपल्या परिने गट व गणात मतदाराच्या मनात कोन या साठी चाचपनीला सुरवात केल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आसतांना तलवाडा जिल्हा परिषद साठी सय्यद मुख्तार अली यांना सर्व समावेशकरित्या पसंती दिल्या जात असुन गेवराई तालुक्याचे लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव (आबा) पंडीत यांच्या मार्गदर्शनात व मतदार माय बापाच्या ईच्छे खातर भारतीय जनता पार्टीच्या वतीने तलवाडा जिल्हा परिषद गटातुन निवडनुक लडवणार आसल्याचे सुतोवाच सय्यद मुख्तार अली यांनी मनकीबात या चर्चे दरम्यान आमच्या प्रतिनिधिशी बोलतांना केले आहे. मतदार जनता जनार्दनाशी तलवाडा जिल्हा परिषद गट व गणातील विविध भागातील सर्व समावेशकरित्या चर्चा करत आसतांना मतदारांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतांना सांगीतले ▶ उर्वरित पान २ वर

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात दि. ०४ नोव्हेंबर पासून कपिलधार यात्रा सुरु होत आहे. तसेच विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, ▶ उर्वरित पान २ वर

# धम्मनिती आपल्या सर्व समस्यांचे उत्तर डॉ.उमेश बगाडे यांचे धम्म चर्चेत प्रतिपादन



**बीड । प्रतिनिधी**

समाजातील नैतिकतेचे अधिष्ठान ब्राह्मणवाद आणि भांडवलवाद या दोन सत्तांनी हिरावून घेतले आहे. बुद्धधम्म हा या सत्तांविरोधातील सामाजिक आणि नैतिक पर्याय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुनर्जन्म सिद्धांत नाकारला पण कर्मसिद्धांत मान्य ▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हास्तर लोकशाही दिनात सहा अर्ज प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये महसूल विभाग ०४ अर्ज भूसंपादन ०१ अर्ज नगर पालीका प्रशासन ०१ अर्ज असे एकूण ०६ तक्रार अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्यक कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते. ▶ उर्वरित पान २ वर

# प्रेम, त्याग आणि निश्चिंती: अच्युत महाराजांच्या वाणीतील अध्यात्माची श्रीमंती!

## मन स्थिर ठेवा, इंद्रियांचे समाधान मिळवा – अच्युत महाराजांचा दिव्य उपदेश भाविकांच्या मनात दरवळला!

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे चालू असलेल्या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहात चौथ्या दिवसाचे कीर्तन चिंतन ह. भ. प. अच्युत महाराज दारफळ यांनी केले. हा हरिनाम सप्ताह विसाव्या शतकातील महान संत विभूती श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सुविद्य धर्मपत्नी कैवल्यमूर्ती वै. ह. भ. प. भागीरथीबाई ज्ञानेश्वर माऊली महाराज गिरी यांच्या दहाव्या पुण्यस्मरणार्थ आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाचे आयोजन ह. भ. प. महादेव महाराज तात्या आणि ह. भ. प. नारायण महाराज भाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. अच्युत महाराजांनी सापडला हातीं । तरी जाली हे निश्चिंती या अभंगावर सखोल चिंतन करताना सांगितले की सेवा करण्यासाठी अंतःकरणात



प्रेम आणि त्याग लागतो. जेव्हा मन स्थिर होते तेव्हा इंद्रियांचे समाधान होते. मानवी जीवनात प्रत्येकाला काही ना काही चिंता आहे. या चिंतेचे मूळ कारण शरीर आहे, आणि शरीराचे मूळ कारण पूर्वजन्मीचे कर्म आहे. गर्भवासातील दुःख हे जीवाचे पहिले दुःख असते, मात्र त्या दुःखातून जर संतांची संगत घडत असेल तर तो जन्म सार्थकी लागतो. पाप आणि पुण्य जीवनात कधी समान होत नाहीत. माणसानं सुखी किंवा दुःखी न होता 'सुखमय' व्हावं. कारण सुख पाहता जवा एवढं असतं पण दुःख पाहता पर्वताएवढं असतं. त्यांनी पुढे एक सुंदर उदाहरण देत म्हटले – काच आहे तोपर्यंत महशीच्या गळ्यात हिरा वाटतो, पण हिरा ओळखल्यावर तो लॉकरमध्ये जातो. तसेच मानवी जीवनही मौल्यवान आहे, तेव्हा त्याची जाणीव झाल्यावरच त्याचे खरे मूल्य कळते. परमार्थात निश्चिंती असते, तर संसारात निश्चिती असते, असे सांगत महाराज म्हणाले – शरीराचा राजा मन आहे, आणि मन स्थिर ▶ उर्वरित पान २ वर

# विभागीय स्पर्धेसाठी सौ. केएसके कनिष्ठ महाविद्यालयाचा नेटबॉलचा मुलींचा संघ परभणीला रवाना

**बीड । प्रतिनिधी**

क्रिडा व युवक सेवा संचलनालय पुणे व जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी शालेय विभागस्तरीय नेट बॉल क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. या क्रिडा स्पर्धेसाठी सौ. केएसके कनिष्ठ महाविद्यालयाचा मुलींचा संघ परभणी येथे रवाना झाला. यासंघामध्ये कु.शिंदे ऋतुजा, कु. शेळके गितांजली, कु.गायकवाड अनुराधा, कु. तनुजा हाडुळे, कु. गौरी राउत, कु. अंकिता गावडे, कु. शिवानी शिंदे, कु. सायली बनसोडे, कु. प्रगती तांगडे, कु. आरती शेळके, कु. सिध्दी कानडे, कु. श्रुती ठोकळ या खेळाडू विद्यार्थीनीचा सहभाग आहे. या संघाला शुभेच्छा देताना मा. नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण



क्षीरसागर, संस्थेचे सहसचिव मा.डॉ. दिपाताई क्षीरसागर, सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमविचे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, डॉ. अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, डॉ. अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# चातुर्मास उत्सवाची दिपोत्सवाने सांगता

## स्वराज्य नगर, बीड येथे दीपोत्सवाच्या प्रकाशात उजळून निघाला भक्तिभावाचा सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

स्वराज्य नगर, बीड येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या चातुर्मास उत्सव २०२५ ची सांगता अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. गेल्या चार महिन्यांपासून सुरू असलेल्या या उत्सवात प्रति सोमवारी ज्ञानेश्वरीवर प्रवचन, नामस्मरण आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. या चातुर्मास कालावधीत परिसरातील शेकडो भाविकांनी हजेरी लावून श्री.ज्ञानेश्वरी भाव चिंतन श्रवण भक्तीचा लाभ घेतला. काल प्रबोधनी एकादशीच्या पावन पर्वावर या चातुर्मासोत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता झाली.

या सांगता सोहळ्याच्या निमित्ताने दिनांक २/११/२५ रविवारी संध्याकाळी



७ते ८ या वेळेत ज्ञानेश्वरीतील पसायदान या विषयावर ह.भ.प. गीते महाराजांनी प्रेरणादायी प्रवचन केले. त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचे आधुनिक काळातील महत्त्व पटवून देत भक्तांना समत्व, दया आणि भक्ति या त्रिसूत्रीचा संदेश दिला. त्यांच्या प्रवचनादरम्यान श्रोत्यांनी मंत्रमुग्ध होऊन प्रवचन ऐकले.

प्रवचनानंतर सर्व भाविकांनी एकत्र येत सामुदायिक दीप प्रज्वलन करून दीपोत्सव साजरा केला. शेकडो दिव्यांच्या उजेडाने स्वराज्य नगर येथील माऊली निवास उजळून निघाले होते. या अनोख्या दीपोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व वयोगटातील भाविक भक्त माता-भगिनी तसेच लहान मुले, तरुण, यांनी एकत्र सहभागी झाले होती. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी माधव महाराज डाके व परिवाराने अथक प्रयत्न केले. त्यांनी संपूर्ण ४ महिने भाविकांच्या सोयीसाठी उत्कृष्ट व्यवस्था केली. या सांगता सोहळ्याला ह.भ.प. महादेव नाना साळुंके, ह.भ.प. मालपाणी सर, ह.भ.प. पांडुरंग खोसे, ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे ,रामायणाचार्य आणि मार्गदर्शक अरुण नाना डाके, श्याम आप्पा डाके आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी स्वराज्य नगर परिसरातील माता-भगिनी, बालगोपाळ व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता फराळाने झाली.